# पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला


बीटु मनी शीट वॉटर प्रुफिंग
घर गळत आहे
काळजी करु नका
मनिषा इंटरप्राईजेस आहे ना
ईपॉक्सी केमिकल कोटींग वॉटर प्रुफिंग
सीव्हील इंजिनिअरींग टेक्नॉलाजी केमिकलद्वारे
लिकेज गॅरंटीने थांबविले जाते
केमिकल वॉटर प्रुफिंग
मो.8956074040,9011396009



शिल्पकार विकासाचा...


# देशदूत



रु.55 प्रति किलो कालीमुछ चावल
रु.55 प्रति किलो बासमती चावल
रु.50 प्रति किलो चिनौर चावल
रु.80 प्रति किलो चना दाल
रु.105 प्रति किलो तुवर दाल
हॉटेल,मेस,किराणा व घरगुतीसाठी घरपोच सुविधा व रिपलेसमेन्ट उपलब्ध
रु.3100 क्विंटल एम.पी का शरबती गेहुँ
अवतार ट्रेडिंग कंपनी
एम-१०५,एम.आय.डी.सी., किरण पाईप के पिछे,जळगांव, मो.9850379271



इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक ११८ । बुधवार, दि.२३ एप्रिल २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


# २७ पर्यटकांचा मृत्यू!

**श्रीनगर ।** जम्मू काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात एकूण २७ पर्यटकांचा मृत्यू झाल्याने देशभरात खळबळ उडाली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता गृहमंत्री अमित शाहा श्रीनगरला रवाना झाले आहेत. अतिरेक्यांनी लोकांची नावे विचारून लोकांवर हल्ले केले आहेत. घटनास्थळी सीआरपीएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहे. टीआरएफ या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पहलगाममध्ये फिरायला आलेल्या पर्यटकांवर हा हल्ला झाला आहे.

जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथील बैसरन पर्वतावर फिरायला गेलेल्या पर्यटकांच्या गटावर दहशतवाद्यांकडून बेछूट गोळीबार झाला आहे. याठिकाणी ट्रेकिंगसाठी गेलेल्या पर्यटकांवर काही अज्ञाक हल्लेखोरांकडून गोळीबार करण्यात आला.

बैसरन पर्वतावर फक्त पायी किंवा घोड्यावरून जाता येते. निसर्गसौंदर्यामुळे या भागाला मिनी स्वित्झर्लंड म्हटले जाते. वाहन थेट पोहोचत नसल्यामुळे सुरूवातीला बचाव कार्यात अडथळे आल्याचे सांगितले जाते. यात पाकिस्तानी दहशतवाद्यांचा हल्ल्यामागे




### नावे विचारुन झाळल्या गोळ्या

गुजरात, तमिळनाडू, ओडिसा, महाराष्ट्र या राज्यातील पर्यटकांवर हा हल्ला झाला. दहशतवाद्यांनी काही पर्यटकांवर त्यांची नावे विचारुन हल्ला करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील एक पर्यटक गंभीर जखमी आहे. तर इतर तीन पर्यटक जखमी आहेत. या सर्वांवर रुग्णालयात उपचार केले जात आहेत.


हात असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांनी या हल्ल्याचा जाहिर निषेध व्यक्त केला. या घटनेत ज्यांना दुखापत झाली, त्या कुटुंबियांच्या मागे आम्ही ठामपणे उभे आहोत. या हल्ल्यामागे फक्त येथील शांतता भंग करून विनाकारण दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो. अशा हल्ल्याचे कधीही समर्थन करता येणार नाही असे त्या म्हणाल्या तर मुख्यमंत्री ओमर अब्दुला यांनी देखी जनतेला शांततेचे आवाहन केले आहे. दरम्यान राज्यपाल मनोज सिन्हा यांनीदेखील या हल्ल्याचा निषेध केला आहे.

### पर्यटकांवर झालेला हल्ला दुर्दैवी; सरकारचे दावे खोटे ठरले - राहुल गांधी

जम्मू काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांचा मृत्य अत्यंत निषेधार्य आणि हृदय पिळवटून टाकणारी घटना आहे. मी शोकाकुल कुटुंबांबद्दल संवेदना व्यक्त करतो आणि जखमी लवकर बरे व्हावेत अशी आशा व्यक्त करतो, दहशतीविरोधात संपूर्ण देश एकत्र आहे. सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये परिस्थिती सामान्य झाल्याचे खोटे दावे खोटे ठरले आता जबाबदारी स्वीकरत भक्कम पावले उचलावीत. जेणेकरून अशा अमानुष घटना होऊच नयेत आणि निर्दोष भारतीयांना अशा पद्धतीने जीव गमवावा लागू नये, असेही राहुल गांधी म्हणाले आहेत.

### दहशतवाद्यांचा 'नापाक' अजेंडा यशस्वी होऊ देणार नाही - पंतप्रधान

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र निषेध करतो. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना आहे. जखमी लोक लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो. पीडितांना शक्य तितकी सर्व मदत पुरवली जाईल. या घृणास्पद कृत्यामागील लोकांना सोडणार नाही. त्यांचा नापाक अजेंडा कधीही यशस्वी होणार नाही,अशी प्रतिक्रिया पीएम मोदींनी व्यक्त केली. तत्पुर्वी, त्यांनी पंतप्रधान मोदींना घटनेची सविस्तर माहिती दिली. गृहमंत्री शाह म्हणाले की, त्यांनी पंतप्रधान मोदींना या घटनेची माहिती दिली आहे. शिवाय, हल्ल्यानंतर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.



### मोदींचा फोन अन् शाह काश्मीरला रवाना



दोन दहशतवादी लष्कराच्या गणवेशात आले आणि त्यांनी एका पर्यटकाला त्याचे नाव विचारले आणि त्याच्या डोक्यात गोळी झाडली. त्यानंतर दहशतवाद्यांनी अंधाधुंद गोळीबार सुरु केला. यामध्ये इतर पर्यटक जखमी झाले. या हल्ल्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दखल घेत गृहमंत्री अमित शाह यांना फोन केला व तिथे जाण्यास सांगितले सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि या प्रकरणात ठोस आणि कठोर कारवाई करण्यास सांगितले. पंतप्रधानांनी गृहमंत्री अमित शाह यांना घटनास्थळी भेट देण्यास सांगितले. या हल्ल्यानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी नवी दिल्लीत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. उपराज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, सीआरपीएफचे महासंचालक, जम्मू आणि काश्मीरचे महासंचालक आणि लष्कराचे अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीला उपस्थित होते.



## संपादकीय

### त्यांचेही वय अडनिडेच

मुलांचे सोळावे वरीस धोक्याचे मानले जात असले तरी याच अडनिड्या वयाचे काही खेळाडू आयपीएल क्रिकेट साखळी सामन्यांमध्ये खेळत आहेत. त्यातील एक-दोघांना मैदान गाजवायची संधी मिळाली आणि त्यांनी त्या संधीचे सोने करायचा प्रयत्नदेखील केला. वैभव सूर्यवंशी हा त्यापैकी एक. तो अवघा १४ वर्षांचा आहे. त्याने सलामीला येऊन फलंदाजी केली. ३४ धावा काढल्या. पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला. त्याचा तो पहिलाच व्यावसायिक सामना होता. सलामीच्या फलंदाजावर मोठीच जबाबदारी असते. संघाला चांगली सुरुवात करुन देऊन मजबूत धावसंख्या उभारुन देण्याचा पाया रचणे अपेक्षित असते. वैभवने ती जबाबदारी पार पाडली. १७ वर्षांच्या आयुष म्हात्रेने ३२ धावा काढल्या आणि एक झेलही टिपला. या मुलांचे वयदेखील वेडेच मानले जाईल. तरीही त्याच वयात ते त्यांच्यासारख्या इतर मुलांपेक्षा वेगळे ठरले. मुलांचा पौगंडावस्थेचा काळ त्यांच्यासाठी आणि त्यांच्या पालकांसाठीही आव्हानात्मक मानला जातो. त्या वयात होणारे शारीरिक आणि मानसिक बदल जसे मुलांना प्रचंड गोंधळवून टाकणारे असतात तसेच पालकांचीही मनस्थिती फारशी वेगळी नसते. कालपर्यंत पालकांच्या शब्दाबाहेर न जाणारा मुलगा अचानक ऐकेनासा होतो अशी बहुसंख्य पालकांची तक्रार असते. मुले अचानक बंडखोर झालेत यावर पालकांचे एकमत आढळते. मोठ्या माणसांनी त्यांना समान वागणूक द्यावी, अशी मुलांची अपेक्षा असते. मुलांना समजावून घेऊन जे पालक परिस्थितीत ताळमेळ पान २ वर

## यूपीएससीत पुण्याचा अर्चित डोंगरे तिसरा



**नवी दिल्ली/पुणे ।** यूपीएसी परीक्षेचा निकाल घोषीत करण्यात आला आहे. या अत्यंत कठीण मानल्या गेलेल्या परीक्षेत देशभरातील नऊ लाख उमदेवार कठोर मेहनत घेऊन परीक्षा देत असतात आणि मोजकेच हजार भर विद्यार्थी देशभरातून उत्तीर्ण होत असतात. यंदा युपीएसीमधून देशातून शक्ती दुबे ही पहिली आली आहे. तर महाराष्ट्राचा अर्चित डोंगरे तिसरा आला आहे तर दुसऱ्या क्रमांकावर हर्षिता गोयल उत्तीर्ण झाली आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अंतिम सिव्हील परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. शक्ती दुबे ही ऑल इंडिया पहिली रॅंक मिळवित देशभरातून टॉपर झाली आहे. आयोगाने एकूण १००९ उमेदवारांची शिफारस केली होती. यांच्या मुलाखती आता ७ जानेवारी २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंत चालणार आहेत.

मुख्य परीक्षेचे आयोजन सप्टेंबर २९२४ रोजी झाले होते. या यशस्वी झालेल्या उमेदवारांच्या मुलाखतीसाठी बोलावले होते. मुलाखती एकूण २८४५ उमेदवार सामील झाले होते.

## वनविभागाच्या पथकावर कुऱ्हाडीने हल्ला

### वनपालासह तीन जण जखमी, मोठा मुद्देमाल हस्तगत

**नवापूर ।** तालुक्यातील वाघदा गावात अवैध लाकूड कारखान्यावर कारवाईसाठी गेलेल्या वनविभागाच्या पथकावर लाकूड तस्करांनी कुऱ्हाडीने हल्ला केल्याची घटना घडली. यात दोन, तीन कर्मचारी जखमी झाले आहेत. वन विभागाच्या पथकाला या कारवाईत अवैध लाकडाचा मोठा मुद्देमाल हाती लागला आहे. याबाबत रात्री उशिरापर्यंत मुद्देमालाची मोजणी व नोंद करण्याचे काम सुरू होते.



याबाबतउपलब्धमाहितीनुसार, तालुक्यातील वाघदा येथे असलेल्या अवैध लाकूड कारखान्यावर आज वनविभागाचे पथक कारवाईसाठी गेले होते. त्यावेळी येथे असलेल्या तस्करांनी वनपालांवर कुऱ्हाडीने हल्ला केला. यात वनपालासह आणखी दोन तीन वन कर्मचारी जखमी झाले आहेत. या कारवाईत वनविभागाच्या हाती लाकडाचा मोठा अवैध मुद्देमाल लागला आहे. वनविभागाच्या पथकाकडून हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाची उशिरापर्यंत मोजणी सुरू होती. याप्रकरणी पोलीसांनी राजू प्रभाकर वसावे नामक इसमाला ताब्यात घेतले आहे. जखमी वनपाल दिपक पाटील यांना उपचारासाठी नंदुरबार येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारा र्थ दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर पोलीसांची कुमक देखील वाघदा गावात बोलविण्यात आली आहे. याबाबत रात्री उशीरापर्यंत नोंद करण्याचे काम सुरु होते.

## भडगावात विद्यार्थ्याचा उष्माघाताने मृत्यू



**भडगाव ।** भडगाव येथील आझाद चौक येथील रहिवाशी दीपक किसन पवार (पांचाळ) यांचा मुलगा दिनेश दीपक पवार (वय १३) याचा उष्माघाताने मृत्यू झाला.

सु.गि.पाटील विद्यालय भडगाव इ.७ वी तील विद्यार्थी याची दि.२१ रोजी खेळत असताना त्याची अचानक तब्बेत बिघाड झाल्याने त्यास उलटी संडासचा त्रास सुरू झाला. त्यास प्राथमिक उपचारासाठी भडगाव येथे दाखल करुन अधिक उपचारासाठी जळगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, सायंकाळीं त्याच्या तब्बेतीमध्ये अधिक बिघाड झाल्याने उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मावळली. यावेळी उपस्थित डॉक्टरांनी उष्माघातामुळे तो मयत झाल्याचे सांगितले. त्यावर दि.२२ रोजी जळगाव येथे शविच्छेदनानंतर भडगाव येथे दुपारी १ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दिपक पवार यांचा आझाद पारंपरिक पांचाळ काम करण्याचा व्यवसाय असून कुटुंबाची अत्यंत गरिबीची परिस्थिती आहे. दिनेश हा अत्यंत हुशार मुलगा होता.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1625 |
| नवती (२) | : 1425 |

### मिश्कीली




## पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर आहेत. आज सौदी अरेबियामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जंगी स्वागत करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमान एअर इंडिया वन हे सौदी अरेबियाच्या हवाई हद्दीमध्ये प्रवाश करताच त्यांच्या विमानाला सौदी अरेबियाच्या हवाई दलाच्या लढाऊ विमानांनी एअर स्कॉट देत त्यांचे स्वागत केले. सौदी अरेबियाचे क्राऊन प्रिंस आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांनी दिलेल्या निमंत्रणाचा स्वीकार करत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सौदी अरेबियाच्या दोन दिवसीय दौऱ्यावर गेले आहेत. भारत आणि सौदी अरेबियामधील सामरिक भागीदारीच्या दृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा दौरा खूप महत्त्वपूर्ण मानला जात आहे. संरक्षण आर्थिक क्षेत्रातील भागीदारीबाबत या दौऱ्यामधून चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या दौऱ्यात अनेक महत्त्वपूर्ण करारांवर सह्या होण्याची शक्यता आहे. दौऱ्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारतीय समुदायाच्या लोकांना भेटणार आहेत.

## यंदा पाऊस लवकर धडकणार

### शेतीसाठी लाभदायक ठरणार : उत्पन्नात वाढ होण्याची आशा वाढली

**मुंबई ।** राज्यात सध्या असह्य उकाडा जाणवत आहे. या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. उकाड्याने हैराण झालेल्यानागरिकांसाठी आनंदाची बातमी आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, यंदा मोसमी पाऊस नेहमीच्या वेळेआधी जूनच्या पहिल्या आठवड्यात दाखल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा उकाड्यापासून लवकरच सुटका होणार असून पावसाळ्यासाठी फार काळ प्रतीक्षा करावी लागणार नाही. राज्यात दरवर्षी पाऊस १० जूननंतर सुरु होतो. पण यंदा ८ ते ११ जून दरम्यान पावसाळा सुरू होण्याची शक्यता आहे. ८ ते १२ जूनदरम्यान पाऊस सुरु होईल, असा ९२ टक्के अंदाज आहे. गेल्यावर्षी मोसमी पाऊस ९ जून रोजी मुंबईत दाखल झाला होता, तर २०२० मध्ये १४ जून



रोजी पावसाचे आगमन झाले होते. पण यावर्षी लवकर पाऊस पडेल असा अंदाज वर्तवला जात आहे. दरवर्षी नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा प्रवास बंगालच्या उपसागरातून सुरू होतो आणि ते १ जूनच्या आसपास केरळमध्ये दाखल होतात. त्यानंतर, अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातून पुढे सरकत ५ जूनपर्यंत कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये पोहोचतात.

### १०५ टक्के पावसाचा अंदाज

संपूर्ण मोसमी पावसाच्या काळात एल निनो सक्रिय असणार नाही. तसेच, हिंदी महासागरीय द्रीध्रुवीयताही तटस्थ आहे. याव्यतिरिक्त, डिसेंबर ते मार्च या काळात युरेशिया आणि हिमालयात बर्फाच्छादित भाग सरासरीपेक्षा कमी राहिला आहे. या सर्व घटकांचा विचार करून भारतीय हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा जास्त, म्हणजेच १०५ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवला आहे, असे हवामान विभागाने म्हटले आहे.

## वक्फ कायद्याविरोधात मुस्लिम संघटनांचा एल्गार

**नवी दिल्ली ।** वक्फ कायदा आणि त्यातील दुरुस्तीविरोधात आज मंगळवारी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे मुस्लिम संघटनांनी एल्गार पुकारला. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने वक्फ वाचवाची हाक दिली आहे. त्यासाठी संमेलन आयोजित केले आहे. संघटनेचे महासचिव मौलाना फजलूर रहमान मुजद्दी यांनी म्हणणे मांडले. आम्ही देशाला स्वंतत्र केले. देशासाठी रक्त सांडले. या देशाचे संरक्षण केले. त्याच धरतीवर आज आम्हाला त्रास देण्यात येत आहे, अशी तक्रार त्यांनी केली. मुजद्दी म्हणाले की, आमच्याकडून मशिदी, दफनभूमी, दर्गा हिसकावण्यात येत आहे. हा काळा कायदा आहे. देशातील लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता हिसकावणारा हा कायदा आहे. वक्फ कायदा मागे घ्या यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. वक्फ वाचवा आंदोलनात खालिद सैफुल्लाह रहमानी, असदुद्दीन ओवैसी, सैयद सदतुल्लाह हुसैनी, मलिक मोहताशिम खान, सज्जादानशीन सरवर चिश्ती सहभागी झाले होते.